क्र.साप्रवि/सेप्र/न.क्र.४१/२७६५९
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ३५७ दिनांक १९ / ०९ / २०११

विषय : प्रकल्पग्रस्त उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांना कळविण्याबाबत.

-------

महावितरण सेवा प्रवेश व वर्गीकरण अधिनियम - २००५ चा परिशिष्ट "छ" मध्ये प्रकल्पग्रस्तांना अथवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांना कंपनीच्या सेवेतील वेतनगट ३ व ४ मधील पदावर नियुक्ती देण्याबाबत अनुसरावयाची कार्यपद्धती विहित केलेली आहे.

२. आता शासनाने शासन परिपत्रक क्र. प्रकल्प-१०१०/मुस-२७२/प्र.क्र.२०६/१०/१६-अ, दिनांक ०७ मे २०११ अन्वये प्रकल्पग्रस्त उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर नियुक्ती प्रधिकाऱ्यांनी सदर नियुक्तीबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने कळविण्याचे निर्देश दिलेले आहेत. सोबत शासन परिपत्रकाची प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी जोडली आहे.

३. सर्व नियुक्ती अधिकारी यांनी उपरोक्त शासन परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलबध आहे.

सहपत्र : वरीलप्रमाणे

१९/९/२०११
मुख्य महाव्यवस्थाक (मा.स.)

E:\Worlikar\RC\File-४१.doc

**<u>प्रकल्पग्रस्तांची पदे व प्रतिक्षायादी बाबत</u>**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : प्रकल्प १०१०/मुस-२७२/प्र.क्र.२०६/१०/१६-अ,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ७ मे, २०११.

वाचा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एईएम-१०८०/३५/१६-अ,
दिनांक २१ जानेवारी १९८०.

**<u>शासन परिपत्रक :-</u>**

प्रकल्पग्रस्त उमेदवारांना नियुक्ती मिळाल्यानंतर अनेकदा नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून जिल्हाधिकारी कार्यालयास अशा नियुक्तीविषयी कळविले जात नाही. त्यामुळे पर्यायाने संबंधित उमेदवाराचे नांव प्रतीक्षा यादीवर तसेच पुढे चालू रहाते, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

२. त्यामुळे, शासन असे आदेश देत आहे की, प्रकल्पग्रस्त उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी सदर नियुक्तीबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने कळवावे व जिल्हाधिकारी कार्यालयाने सदर उमेदवाराच्या नांवापुढे नोकरी मिळाली असल्याबाबतची नोंद घ्यावी.

सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय / निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या शासन परिपत्रकानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना तात्काळ द्याव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०११०५०७१५००३५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
( गो. आ. लोखंडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

विधानसभा व विधान परिषदेचे सर्व सदस्य,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव / शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,

C:\Documents and Settings\admin\Desktop\G R.lwp\5